## नि.क्र.१६९ वर आदेश
## (दिनांक ०९.०४.२०२१)

वादींनी सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी दि.०१.०१.२०२१ रोजी आदेश १२ दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये सादर केलेली नोटीस खारीज करण्याकरीता सादर केला आहे. वादींतर्फे ॲड. श्री. व्ही. एस. शेळके यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी निशाणी क्रं.१६५ अन्वये जी नोटीस दिलेली आहे ती कायदयाच्या चौकटीत नसून ती वादी यांच्यावर व्यक्तीशः बजावण्यात आलेली नाही. प्रतिवादी क्रं.२ ते ४ यांनी त्यांच्या नोटीसमध्ये कोणत्या वादींनी कोणत्या प्रश्नांचे उत्तर दयायचे आहे याबाबत नमूद केलेले नाही. त्यांनी पुढे अशी विनंती केली आहे की, सदरची नोटीस ही खारीज करण्यात यावी.

२. प्रतिवादी क्रं.२ ते ४ तर्फे श्री. डी. ए. पौळ यांनी असा युक्तीवाद केला की, सदरच्या प्रतिवादींनी नोटीस निशाणी क्रं.१६५ ही वादींना त्यात नमूद केलेले मुद्दे त्यांना मान्य करण्याकरीता दिलेली आहे. सदरच्या नोटीसमध्ये प्रश्नावली दिलेली नाही. त्यामुळे वादींनी सादर केलेला अर्ज दिशाभूल करणारा असल्यामुळे तो खारीज होण्यास पात्र आहे.

३. सदरचा दावा हा घोषणा व कायमचा मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. तसेच वादींनी वाटणी, वेगळा ताबा व रक्कम परत मिळण्याकरीता पर्यायी मागणी केलेली

आहे. प्रतिवादी क्रं.२ ते ४ यांनी निशाणी क्रं.१६५ अन्वये सादर केलेल्या नोटीसचे अवलोकन केले असता त्यात असे नमूद केले आहे की, सदर नोटीसची एक प्रत वादीकरीता देण्यात येते आहे. त्यामुळे सदरची नोटीस ही वादींना व्यक्तीशः त्यांच्यावतीने त्यांचे अधिवक्ता असताना परस्पर त्यांना देण्याची आवश्यकता आहे ही बाब संयुक्तिक वाटत नाही. आदेश १२ नियम १ दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये – **हकीकत कबूल असल्याविषयी नोटीस** – *दाव्यातील कोणत्याही पक्षकारास दुस–या कोणत्याही पक्षकाराच्या संपुर्ण हकीकती किंवा तिच्या कोणत्याही भागात तथ्य असल्याचे आपणास कबूल आहे अशी आपल्या वादकथनाद्वारे किंवा अन्य प्रकारे लेखी नोटीस देता येईल.* त्यामुळे वादींना नोटीस निशाणी क्रं.१६५ यावर काय उत्तर दयायचे आहे, कोणत्या वादींतर्फे कोणते उत्तर सादर करायचे आहे किंवा कोणतेही उत्तर सादर करायचे नाही, हे यांनीच ठरावयाचे आहे. त्यामुळे वादींनी घेतलेला आक्षेप हा कायदयाला अनुसरुन नसल्यामुळे तो ग्राहय धरण्यात येत नाही. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वाक्षरीत/–
(अ.रा. सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
अहमदपूर.

अहमदपूर
दिनांकः– ०९.०४.२०२१